पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- 2023-2024

# सांस्कृतिक विभाग

प्राचार्य
डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख
प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर

सहाय्यक

डॉ. नितीन माळेगावकर

# पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव

देवगिरी संगीत प्रतिष्ठान व पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ व २० जानेवारी २०२४ या दोन दिवशी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात "पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सवाचे" आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात फुलंब्री पंचक्रोशीतील स्थानिक कलावंतांना आपापली कला सादर करण्याची संधी दिली गेली. तसेच या संगीत महोत्सवाचे उदघाटन पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, तथा फुलंब्री विधान सभेचे आमदार मा. आ. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्रीच्या सभापती, मा. सौ. अनुराधाताई चव्हाण, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, मा. श्री. निवृत्ती गावंडे, स्व. कृष्णराव फुलंब्रीकर यांची नात मा. श्रीमती, प्रिया फुलंब्रीकर उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात बासरी, व्हायोलीन, तबला, पखवाज, गायन, नाट्यसंगीत, भरतनाट्यम आदी विविध कलाप्रकारांच्या उत्कृष्ट अशा सादरीकणाचा आस्वाद रसिक श्रोत्यांना घेता आला. फुलंब्री परिसरातील कलाकारासाठी,व संस्थेतील विद्यार्थी कलाकारासाठी दिनांक 19 व 20 जानेवारी रोजी सायं. ६ ते ७ एक एक तास आपली कला सादर करण्यासाठी वेळ देण्यात आला होता. दोन दिवसात संस्थेतील 8 शाळांनी तसेच स्थानिक 5 कलापथकांनी गायन व वाद्य वादन याचे सादरीकरण केले. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे होते.

**पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव फुलंब्री**

**१९-२० जानेवारी २०२४ - सायं. ६.०० ते ७.००**

| अ.क्र. | कलावंताचे / शाळेचे नाव | गावाचे नाव | कलाप्रकार | कलावंतांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्री जुनेश्वर विद्यालय | वरुड | भावगीत | ०५ |
| २ | ---------‘’--------------‘’----- | ------‘’--- | गवळण | ०५ |
| ३ | संत भगवानबाबा आश्रम शाळा | आन्वी | भजन | ०३ |
| ४ | संत गाडगेबाबा प्रा. व मा. आश्रमशाळा | अंजनडोह | वादन | ४ |
| ५ | श्री रामेश्वर विद्यालय | वाघोळा | पखवाज | ०२ |
| ६ | श्री संत सावता गुरुकुल प्रा. विद्यालय | फुलंब्री | भक्तीगीत | ०८ |
| ७ | श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय | फुलंब्री | पखवाज वादन | ०३ |

**१९- जानेवारी २०२४- कार्यक्रम नियोजन**

**२०- जानेवारी २०२४- कार्यक्रम नियोजन सायं. ६.०० ते ७.००**

| अ.क्र. | कलावंताचे / शाळेचे नाव | गावाचे नाव | कलाप्रकार | कलावंतांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्री संत सावता गुरुकुल मा. विद्यालय | फुलंब्री | समूह नुर्त्य | ३२ |
| २ | धर्मवीर संभाजी मा. व उ. मा. वि. | छ. संभाजीनगर | वाद्य जुगलबंदी | ०४ |
| ३ | कु. वैष्णवी नाईक - | फुलंब्री | अभंग | ०३ |
| ४ | सौ.सरला भगवान वाघ | फुलंब्री | भजन | ०३ |
| ५ | श्री. गणेश कला संच | फुलंब्री | गवळण | ०५ |
| ६ | श्री वेदान्त मच्छिंद्र काकडे | वाघलगाव | भजन | ०१ |
| ७ | श्री अभिषेक सोनवणे भजनी मंडळ | रेलगाव | पखवाज वादन | ०८ |
| ८ | श्री के. ए. बनकर- संत तुकाराम विद्यालय | शिंगी | भजन | ०१ |

देवगिरी संगीत प्रतिष्ठान द्वारे सायंकाळी 7 ते 10 काही या वेळेत काही नामवंत कलाकारांचे सादरीकरण झाले. ज्यात दिनांक 19 जानेवारी 2024 रोजी वाद्य त्रिवेणी श्री.निरंजन भालेराव (बासरी), श्री. प्रबोध जोशी (व्हायोलीन) व श्री. दिनेश डोळे (तबला) छत्रपती संभाजीनगर यांनी आपली जुगलबंदी सादर केली. गायन- पं. धनंजय जोशी (नाट्य व भक्ती संगीत गायन ) नांदेड यांनी आपली कला सादर केली.
दिनांक 20 जानेवारी 2024 रोजी शास्त्रीय नृत्य- ध्यास परफॉर्मिंग आर्ट्स भरतनाट्यम
सौ. केतकी नेवपूरकर यांच्या शिष्या रिद्धी बारपांडे, मानसी कुलकर्णी, अनन्या पाटील, श्रेया कुलकर्णी व वैष्णवी तोतला यांनी आपली कला सादर केली. गायन- पं. संजय गरूड (शास्त्रीय संगीत व अभंगवाणी) पुणे, साथ संगत- श्री. शांती भूषण देशपांडे (संवादिनी) श्री. प्रशांत गाजरे (तबला) व श्री.विश्वेश्वर जोशी (पखवाज) यांनी आपली कला सादर केली.
उद्घाटन सोहळयात **'वंदे मास्तरम'** या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वंदे मातरम हे राष्ट्रगीत व्हावे यासाठी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी दिलेल्या लढ्याची सविस्तर कहानी या पुस्तकात आहे. याप्रसंगी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांची नात मा. श्रीमती प्रिया फुलंब्रीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उद्घाटन सोहळयाचा अध्यक्षीय समारोप मा. आ. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी केला.
संगीत महोत्सवाच्या पहिल्या दिवशी स्थानिक कलाकारांचे सादरीकरण झाले. त्यानंतर निरंजन भालेराव यांचे बासरी वादन झाले. त्यांना दिनेश डोळे यांनी तबल्यावर साथ संगत केली. पहिल्या दिवशीचा समारोप पंडित अजय पोहनेरकर यांचे शिष्य सुरमणी धनंजय जोशी यांच्या बहारदार गायनाने झाला.सुरुवातीला मारूबिहाग रागातील बंदिश त्यांनी सादर केली. त्यानंतर विविध नाट्यगीते सादर केली. गंधर्व काळातील नाट्यगीते आणि नंतरच्या अभिषेकी पद्धतीची नवीन नाट्यगीते धनंजय जोशी यांनी अतिशय सुंदर रीतीने सादर केली.
महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशीची सुरुवात स्थानिक कलावंतांनी केली. फुलंब्रीकर मास्तरांचे गाजलेले गीत लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया यावर संत सावता गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी बसवलेले नृत्य दाद मिळवून गेले. यानंतर ध्यास परफॉर्मिंग सेंटरच्या विद्यार्थिनी केतकी नेवपूरकर यांच्या शिष्या रिद्धी बारपांडे, मानसी कुलकर्णी, अनन्या पाटील, श्रेया कुलकर्णी व वैष्णवी तोतला यांनी अतिशय बहारदार असे भरतनाट्यम नृत्य सादर केले. या कार्यक्रमाला सुद्धा रसिक प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. दुसऱ्या दिवशीचा समारोप भारतरत्न भीमसेन जोशी यांचे शिष्य पंडित संजय गरुड यांच्या गायनाने झाला. त्यांनी सुरुवातीला राग कलाश्री सादर केला. त्यानंतर पंडित भीमसेन जोशी यांचे लोकप्रिय अभंग सादर केले. मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांची गाजलेली भैरवी आगा पंढरीच्या राया गाऊन त्यांनी समारोप केला या कलाकारांना शांती भूषण देशपांडे (संवादिनी) श्री. प्रशांत गाजरे (तबला) व श्री.विश्वेश्वर जोशी (पखवाज) यांनी साथ दिली.
दोन दिवसीय संगीत महोत्सवाच्या या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. मा. श्री. सुहास शिरसाट (नगराध्यक्ष, फुलंब्री नगरपंचायत), श्री. योगेश मिसाळ (महाविद्यालय विकास समिती सदस्य), डॉ. प्रदीप जब्दे (पालक संचालक पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था), डॉ. सर्जेराव ठोंबरे (विश्वस्त पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था), श्री. रवींद्र काथार (उद्योजक, फुलंब्री) यांची प्रमुख उपस्थिती होती.
संगीत महोत्सव कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. श्रीकांत उमरीकर, प्राचार्य डॉ. एस आर टकले, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. मंजुषा नळगीरकर व डॉ. नितीन माळेगावकर यांनी परिश्रम घेतले. संगीत महोत्सवासाठी मोठ्या संख्येने 200 प्रेक्षक वर्ग उपस्थित होता.

# पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव छायाचित्रे






**संगीत महोत्सवाचे उद्घाटन करताना मा. आ. श्री. हरिभाऊ बागडे (नाना)**

**वंदे मास्तरम पुस्तकाचे प्रकाशन करताना**




मा. श्रीमती प्रिया फुलंब्रीकर मनोगत व्यक्त करतांना




जुनैश्वर विद्यालय वरुड चा संघ गीत सादर



महाविद्यालयाचा विद्यार्थी पखवाज वादन करताना



उपस्थित प्रेक्षक वर्ग




त्रिवेणी जुगलबंदी सादर करताना कलाकार



सुरमणी धनंजय जोशी गीत सादर करताना




स्थानिक कलाकार वैष्णवी नाईक गीत सादर करताना




लखलख चंदेरी या गीतावर नृत्य सादर करताना संत सावता गुरुकुल चे विद्यार्थी






ध्यास परफॉर्मिंग आर्टच्या विद्यार्थिनी भरतनाट्यम सादर करताना




पंडित संजय गरुड गीत सादर करताना




कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख अतिथी

## बातमी प्रसिद्धी



महाराष्ट्र टाइम्स

# फुलंब्रीमध्ये रंगणार संगीत महोत्सव

**कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजन**

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

फुलंब्रीचे भूमीपुत्र संगीतकार, गायक, संगीत रंगभुमीवरचे महान नट पद्मभुषण संगीत कलानिधी कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या स्मृतीनिमित्त दोन दिवसांच्या संगीत महोत्सवाचे आयोजन फुलंब्री येथे करण्यात आले आहे. यंदा महोत्सवाचे दुसरे वर्ष आहे.

कृष्णराव फुलंब्रीकरांच्या जयंतीनिमित्त संगीत महोत्सवाचे आयोजन १९ आणि २० जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले आहे.

संगीत महोत्सवाचे उद्‌घाटन आमदार हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते होणार आहे. बाजार समितीच्या सभापती अनुराधा चव्हाण, पंडीत दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थचे सचिव निवृत्ती गावंडे, प्रिया फुलंब्रीकर (मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांची नात) हे उपस्थित राहणार आहेत. या वेळी 'वंदे मातरम' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

या संगीत महोत्सवात पं. संजय गरूड (गायन), धनंजय जोशी (नाट्यगीत), रिद्धी बारपांडे-मानसी कुलकर्णी- अनन्या पाटील- श्रेया कुलकर्णी- वैष्णवी तोतला (भरत नाट्यम) सादर करणार आहेत. 'वाद्य त्रिवेणी'चा अनोखा कार्यक्रम निरंजन भालेराव (बासरी), प्रबोध जोशी (व्हायोलीन) गणेश डोळे (तबला) हे कलाकार सादर करणार आहेत. या कलाकारांना साथसंगतीसाठी प्रशांत गाजरे (तबला), शांतिभूषण चारठाणकर (संवादिनी व ऑर्गन), विश्वेश्वर जोशी (पखवाज), हे कलाकार हजेरी लावणार आहेत.

दीनदयाळ संस्थेतील कलाकार, स्थानिक कलाकारांचे सादरीकरण होणार आहे. पंडीत दिनदयाळ शिक्षण संस्थेचे संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय व देवगिरी संगीत प्रतिष्ठानतर्फे आयोजन करण्यात आले आहे.



सोमवार दि.२२ ते २८ जानेवारी २०२४

# फुलंब्रीत पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव उत्साहात



सामना

# पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव उत्साहात

सुरज सोनवणे दै सामना तालुका प्रतिनिधी फुलंब्री



महाराष्ट्र टाइम्स

# रंगला फुलंब्रीकर संगीत महोत्सव

**फुलंब्रीत नागरिकांना सांगीतिक मेजवानी**

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

संगीत कलानिधी कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या स्मृतीत दोन दिवसांच्या संगीत महोत्सवाचे आयोजन फुलंब्री येथे श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय येथे करण्यात आले होते.

महोत्सवाचे उद्‌घाटन आमदार हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी बाजार समितीच्या सभापती अनुराधा चव्हाण, पंडित दीनदयाल उपाध्याय, शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे, प्रिया फुलंब्रीकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होती.

उद्‌घाटन सोहळ्यात 'वंदे मातरम' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत व्हावे, यासाठी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी दिलेल्या लढ्याची सविस्तर कहाणी या पुस्तकात आहे.

या संगीत महोत्सवात पहिल्या दिवशी स्थानिक कलाकारांचे सादरीकरण झाले. त्यानंतर निरंजन भालेराव यांचे बासरीवादन झाले. त्यांना दिनेश डोळे यांनी तबल्यावर साथसंगत केली. पहिल्या दिवसाचा समारोप पं. अजय पोहनकर यांचे शिष्य सूरमणी धनंजय जोशी यांच्या बहारदार गायनाने झाला. सुरुवातीला मारुबिहाग रागातील बंदिश त्यांनी सादर केली. त्यानंतर विविध नाट्यगीते सादर केली. गंधर्वकाळातील नाट्यगीते आणि नंतरच्या अभिषेकी पद्धतीची नवीन नाट्यगीते धनंजय जोशी यांनी ताकदीने गायली.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात स्थानिक कलावंतांनी केली. फुलंब्रीकर मास्तरांचे गाजलेले गीत 'लख लख चंदेरी तेजाची आली दुनिया' यावर बसवलेले नृत्य दाद मिळवून गेले.

यानंतर ध्यास परफॉर्मिंग सेंटरच्या विद्यार्थिनी केतकी नेवपुरकर यांच्या शिष्या रिद्धी बारपांडे-मानसी कुलकर्णी- अनन्या पाटील- श्रेया कुलकर्णी- वैष्णवी तोतला यांचे अतिशय बहरदार असे भरतनाट्यम सादर झाले. या कार्यक्रमाला उपस्थितांची मोठी दाद मिळाली.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसासह महोत्सवाचा समारोप भारतरत्न भीमसेन जोशी यांचे शिष्य पं. संजय गरूड यांच्या गायनाने झाला. त्यांनी सुरुवातीला राग कलाश्री सादर केला. त्यानंतर पं. भीमसेन यांचे लोकप्रिय अभंग सादर केले. मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांची गाजलेली भैरवी 'अगा पंढरीच्या राया' गाऊन त्यांनी समारोप केला. या कलाकारांना प्रशांत गाजरे (तबला), शांतिभूषण चारठाणकर (संवादिनी व ऑर्गन), विश्वेश्वर जोशी (पखवाज) यांनी साथ केली. पंडित दीनदयाळ शिक्षण संस्थेचे संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय आणि देवगिरी संगीत प्रतिष्ठान यांच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

वंदे मातरम या पुस्तकाचे प्रकाशन संगीत महोत्सवात करण्यात आले.

# श्री संत सावतामाळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## सांस्कृतिक विभाग

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष 2023 - 2024

**सांस्कृतिक विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2023 - 2024 मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.**

| |
|---|
| **जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम** |
| **व्याख्यान कार्यक्रम** |
| **केंद्रीय युवा महोत्सव सहभाग** |
| **सांस्कृतिक कार्यक्रम (नॅक टीम समोर)** |
| **मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव** |
| **वार्षिक स्नेहसंमेलन** |

### • जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम•

ज्या व्यक्तींनी समाज व देशासाठी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने 21अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले. ज्यात

| अ.क्र | **दिनांक** | **कार्यक्रम** |
|---|---|---|
| 1 | 26/6/2023 | राजर्षी शाहू महाराज जयंती |
| 2 | 1/7/2023 | वसंतराव नाईक जयंती |
| 3 | 15/7/2023 | श्री. संत सावता महाराज पुण्यतिथी |
| 4 | 23/7/2023 | लोकमान्य टिळक जयंती |
| 5 | 01/08/203 | अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर पुण्यतिथी |
| 6 | 13/8/2023 | श्री रावसाहेब पाटील दांडगे पुण्यतिथी |
| 7 | 21/8/2023 | राजीव गांधी जयंती |
| 8 | 7/9/2023 | राजे उमाजी नाईक जयंती |
| 9 | 16/10/2023 | डॉ. ए पी जे अब्दुल कलाम जयंती |
| 10 | 28/10/2023 | महर्षी वाल्मिक जयंती |
| 11 | 30/10/2023 | सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी जयंती |
| 12 | 06/12/2023 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन |
| 13 | 3/1/2024 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती |
| 14 | 12/01/2024 | राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती |

| | | |
|---|---|---|
| 15 | 23/1/2024 | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती |
| 16 | 15/2/2024 | संत सेवालाल महाराज जयंती |
| 17 | 23/03/2024 | शहीद दिन |
| 18 | 11/04/2024 | महात्मा फुले जयंती |
| 19 | 14/04/2024 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती |

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

## सांस्कृतिक विभाग

## कार्यक्रमाची छायाचित्रे


- **जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम**



राजर्षी शाहू महाराज जयंती



वसंतराव नाईक जयंती




**लोकमान्य टिळक जयंती**



**श्री. संत सावता महाराज पुण्यतिथी**




**अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर पुण्यतिथी**



श्री रावसाहेब पाटील दांडगे पुण्यतिथी



राजीव गांधी जयंती



राजे उमाजी नाईक जयंती






**डॉ. ए पी जे अब्दुल कलाम जयंती**



महर्षी वाल्मिक **जयंती**



सरदार वल्लभाई पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन**





**सावित्रीबाई फुले जयंती अभिवादन कार्यक्रमात सावित्रीबाईंच्या शैक्षणिक कार्याबद्दल माहिती देताना डॉ. संजीव कुमार पांचाळ**



**राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती**



नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती





संत सेवालाल महाराज जयंती  प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. नितीन माळेगावकर



भगतसिंग, शिवराम राजगुरू व सुखदेव थापर या शहिदांना शहीद दिनी अभिवादन करताना सर्व कर्मचारी





महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याविषयी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर व उपस्थित प्राध्यापक

**महात्मा फुले जयंती**




**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती**

## ● व्याख्यान कार्यक्रम●

➢ **श्री संत सावता महाराज पुण्यतिथी**:

दिनांक 15 जुलै 2023 रोजी सावता महाराज पुण्यतिथी निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. प्रमोद कुमावत उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर.टकले उपस्थित होते. कार्यक्रमाची भूमिका डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मांडली.

"श्री संत सावता महाराज यांचे अध्यात्मिक विचार " या विषयावर बोलत असताना डॉ. कुमावत म्हणाले की, संतांनी कर्मसिद्धांत मांडला आहे. संत सावता महाराज यांनी कर्म हेच सर्वस्व मानून आपला व्यवहार केलेला आहे. कामात देव आहे. त्याचा विचार होणे अपेक्षित आहे. तसेच खरी जागतिकीकरणाची संकल्पना आताची नसून ती वेद काळातील असल्याची साक्ष विविध उदाहरणे देऊन दिली. उदा. 'हे विश्वची माझे घर' म्हणणारे संत त्याच काळातील होते. त्यांनी आपल्या विचारातून वैश्विकतेची संकल्पना लोकांपुढे मांडली. म्हणून आपण आपले ज्ञान जगापुढे खुले केले पाहिजे. यासोबतच जीवन शुद्ध केले पाहिजे. हा विचार व्यक्त केला. पुढे ते असेही म्हणाले की, तत्कालीन वैदिक कालखंड हा समृद्ध होता. त्या कालखंडात विचारांची पेरणी खऱ्या अर्थाने संतांनी केली. म्हणून त्यांच्या तात्विक चिंतनाची सद्यस्थितीला आवश्यकता असल्याचे भासते. जुन्या कथा कांही ना कांही शिकवून जात असतात, त्यातील मर्म आपण जाणून घेतले पाहिजे. यासोबतच आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या अनेक प्रार्थना असतात, त्यामधून काही संस्कार घेतले पाहिजेत. अर्थात सर्वच संतांचा विचार लोककल्याणासाठी राहिलेला आहे. म्हणून तो विचार व्यापक आहे. व त्यातून प्रेरणा घेऊन जगता आले पाहिजे. असे मत स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर.टकले यांनी केला. उपस्थित मान्यवरांचे आभार कु. मनीषा भालेराव या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. प्राजक्ता इंगळे या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.नितीन माळेगावकर यांनी सहकार्य केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

➢ **साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी :-**

दिनांक 1 ऑगस्ट 2023 रोजी "अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक : विचार व कार्य" या विषयावर सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री योगेश सोनवणे, प्रकल्प अधिकारी समाज कल्याण विभाग, औरंगाबाद उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर.टकले उपस्थित होते.

बोलत असताना श्री सोनवणे म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक या थोर पुरुषांकडूनच मानवतेची खरी शिकवण मिळते. संबंध आयुष्यात या थोर पुरुषांनी मानवकल्याणाचाच लढा लढला आहे. शोषितांच्या कल्याणासाठी आणि रक्षणासाठी आपण लढले पाहिजे, हा विचार तेवत ठेवणारे थोर महापुरुषच असतात. अण्णाभाऊ असोत की लोकमान्य टिळक असोत यांनी समाजासाठी दिलेले योगदान विसरता येण्यासारखे नाही. अण्णाभाऊंचे साहित्य हे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध चीड पेरणारे होते. तर परकीयांच्या अन्यायाविरुद्ध विचारांची चळवळ निर्माण करणारे लेखन लोकमान्य टिळकांच्या होते हे नाकारता येत नाही. असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. तर उपस्थित मान्यवरांचे आभार कु. प्राजक्ता इंगळे या विद्यार्थीनीने मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. गायत्री दुतोंडे या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

- **आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग:**

कै. विनायकरावजी पाटील स्मृती समारोह 2023 निमित्त देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक 28 व 29 डिसेंबर 2023 रोजी आयोजित वक्तृत्व स्पर्धेत कु. वैष्णवी बाबासाहेब दाभाडे बीएससी प्रथम वर्ष आणि कु. आरती गवनाजी केजभट बीएससी तृतीय वर्ष यांनी सहभाग घेतला होता.

- **राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती :-**

दिनांक 12 जानेवारी 2024 रोजी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेचे विषय होते स्वराज्य संकल्पक राष्ट्रमाता जिजाऊ आणि युवा चेतना स्वामी विवेकानंद. सदरील स्पर्धेत महाविद्यालयातील 9 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ज्यात प्रथम क्रमांक गायत्री दुतोंडे, द्वितीय क्रमांक कीर्ती गायकवाड व तृतीय क्रमांक आरती केजभट हिने मिळविला वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण डॉ. संजीव कुमार पांचाळ व डॉ. नितीन माळेगावकर यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर हे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

- **विद्यापीठ नामविस्तार दिन**

दिनांक 14 जानेवारी 2024 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमीत्त व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. किशोर वाघ (इंग्रजी विभाग प्रमुख, राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथरी) हे लाभले होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाम विस्तार चळवळ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, भारतातील जाती व्यवस्था समूळ नष्ट झाल्याशिवाय समाज विकसित होणार नाही. पूर्वी येथे जातिव्यवस्था मूळ धरून असल्यामुळे विशिष्ट लोकांनाच शिक्षणाची संधी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून संभाजीनगर येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन करून उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि म्हणून अशा महामानवाचे नाव विद्यापीठाला देण्यात यावे अशी मागणी होती. परंतु हे नाव देण्यासाठी खूप मोठा संघर्ष मराठवाड्यातील लोकांना करावा लागला या नामविस्तार चळवळीचा इतिहास अतिशय चांगल्या पद्धतीने त्यांनी मांडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले तर अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस आर टकले यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी नाईक यांनी केले तर आभार साक्षी पोफळे यांनी मांडले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

- **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 133 व्या जयंतीनिमित्त श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक 14 एप्रिल 2024 रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले ते पुढील प्रमाणे…..

**वक्तृत्व स्पर्धा**:

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य** या विषयावर सकाळी 9 वाजता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात एकूण 12 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला ज्या पैकी कु. आरती केजभट हिने प्रथम तर कु. पायल तावरे हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. सुरेश मुंढे व प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले.

**व्याख्यान कार्यक्रम:**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यान कार्यक्रमाची सुरुवात बौद्ध वंदनेने झाली ही बौद्ध वंदना श्री. प्रेम चव्हाण यांनी म्हटली तसेच त्याचा अर्थही विद्यार्थ्यांना सांगितला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन माळेगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. विवेक घोलप (मराठी विभाग, विवेकानंद कला महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर) यांनी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रासंगिकता** या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. डॉ. घोलप म्हणाले, देशात अनेक लोक जन्मतात आणि मरतात परंतु स्वतःची ओळख निर्माण करण्याचे भाग्य फार कमी जणांना लाभते. असेच भाग्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिळाले ते त्यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्यामुळे. आपल्या दुःखातून बाहेर पडायचे असेल तर जिद्दीने लढायला शिकले पाहिजे असा सल्ला डॉ. बाबासाहेबांनी समाजाला दिला होता. बाबासाहेबांनी त्यांच्या वडिलांचे स्वप्न हे स्वतःचे ध्येय बनवून समाजासाठी स्वतःचे आयुष्य झिजवले. महापुरुषांची कृती आणि विचार ही राष्ट्राची संपत्ती असते त्यामुळे महापुरुषांचे विचार आत्मसात करणे ही काळाची गरज आहे असे घोलप यांनी प्रतिपादन केले. यासोबतच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा, कृषी, सिंचन, शिक्षण, स्त्रियांच्या समस्या व संरक्षण अशा विविध विषयांवर मांडलेल्या विचारांवर सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस आर टकले यांनी केला. व्याख्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पायल तावरे, पाहुण्यांचा परिचय व स्वागत कु. भाग्यश्री शिंदे आणि आभार कु. आकांक्षा शेवाळे हिने मानले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**ग्रंथप्रदर्शन:**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन देखील करण्यात आले होते. ग्रंथ प्रदर्शनात बाबासाहेबांनी लिहिलेली पुस्तके तसेच त्यांच्यावर लिहिलेली पुस्तके ठेवली होती. या प्रदर्शनास सर्व विद्यार्थ्यांनी भेट दिली, पुस्तके पाहिली तसेच ती वाचनासाठी घरी नेली.

**श्री संत सावता महाराज पुण्यतिथी -दिनांक – 27 जुलै 2022**






सावता महाराज पुण्यतिथी निमित्त श्री संत सावता महाराज यांचे अध्यात्मिक विचार या विषयावर डॉ. प्रमोद कुमावत विचार मांडताना

**दिनांक 1 ऑगस्ट 2022 :- साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी:-**






"अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक:जीवन व कार्य " या विषयावर श्री योगेश सोनवणे विचार मांडताना






12 जानेवारी 2024 रोजी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेत विचार व्यक्त करतात







दिनांक 14 जानेवारी 2024 रोजी डॉ. किशोर वाघ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाम विस्तार चळवळ या विषयावर मार्गदर्शन करताना व कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी व कर्मचारी

महाराष्ट्र टाइम्स



श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले.

# थोर महापुरुषांचा लढा विचारांचा असतो

**योगेश सोनवणे यांचे मत**

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून समाज कल्याण विभागाचे प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

या वेळी सोनवणे म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक या थोर पुरुषांकडूनच मानवतेची खरी शिकवण मिळते. संबंध आयुष्यात थोर पुरुषांनी मानवकल्याणाचा लढा लढला आहे. शोषितांच्या कल्याणासाठी आणि रक्षणासाठी आपण लढले पाहिजे, हा विचार तेवत ठेवणारे थोर महापुरुषच असतात. अण्णा भाऊ असोत की लोकमान्य टिळक असोत यांनी समाजासाठी दिलेले योगदान विसरता येण्यासारखे नाही. अण्णा भाऊंचे साहित्य हे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध चीड पेरणारे होते. तर परकीयांच्या अन्यायाविरुद्ध विचारांची चळवळ निर्माण करणारे लेखन लोकमान्य टिळकांचे होते हे नाकारता येत नाही.'

अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. प्राजक्ता इंगळे हिने आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गायत्री दुतोंडे हिने केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. मंजुषा नळगीरकर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी, डॉ. रामकिशन लोमटे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



# शिक्षणातून स्वाभिमान निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांनी पीपल्स शिक्षण संस्थेची स्थापना केली - डॉ. किशोर वाघ

फुलंब्री : प्रतिनिधी

शिक्षणातून स्वाभिमान निर्माण करून अज्ञान नष्ट करता येईल. असा स्वाभिमान निर्माण करण्यासाठी मराठवाड्यात बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स शिक्षण संस्थेची स्थापना केली, असे प्रतिपादन प्रा.डॉ.किशोर वाघ यांनी रविवार दि.१४ रोजी बोलताना केले.

फुलंब्री येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी राजर्षि शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. किशोर वाघ प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित राहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले.

पुढे बोलतांना डॉ. वाघ म्हणाले की, येथील जातीव्यवस्था समूळ नष्ट झाल्याशिवाय समाज विकसित होणार नाही. परंतु आपले हेच दुर्दैव आहे. कारण आपला जन्म कोठे व्हावा हे आपल्या कुणाच्याही हाती असत नाही. आणि यामुळे विकासाला अडचण निर्माण होते. पूर्वी येथे जातीव्यवस्था मूळ धरून बसल्यामुळे विशिष्ट लोकांनाच शिक्षणाची संधी होती. याला विरोध करणारं व्यक्तिमत्व म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शैक्षणिक धोरणाचा विचार प्रामुख्याने केला आहे. मिलिंद हे शिक्षणाचे केंद्रबिंदू मानून या माध्यमातून येथील पिचून निघालेल्या जनतेसाठी शिक्षणाची दारे खुली केली. म्हणून अशा महामानवाचे नाव या मराठवाडा विद्यापीठाला देण्यात आले. परंतु हे नाव देण्यासाठीचा संघर्ष मराठवाड्यातील लोकांनी अनुभवला आहे. या नामविस्ताराचा इतिहास व चळवळ अतिशय मार्मिक भाषेत उपस्थित विध्यार्थ्यांपुढे मांडला. उपस्थित मान्यवरांचे आभार कु. साक्षी पोकळे हिने मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. कल्याणी नाईक हिने केले. प्रार्थना कु. शिवानी व कु. पायल यांनी म्हटली. पाहुण्यांचा परिचय कु. पायल तावडे हिने करून दिला.

## • वार्षिक स्नेहसंमेलन •

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक 8 ते 10 फेब्रुवारी 2024 दरम्यान पार पडले. दिनांक 9 फेब्रुवारी 2024 रोजी सायंकाळी विविध कला गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या 17 विद्यार्थ्यांनी संगीत रजनी मध्ये 12 इव्हेंट सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी दाभाडे हिने केले.

| अ. क्र | कलाप्रकार | सहभागी मुले |
|---|---|---|
| 1 | गणेश वंदना | अश्विनी नाईक |
| 2 | वासुदेव- गीत सुंदर माझे जाते ग | आरती प्रधान, राधा मिसाळ, पायल तावरे, अश्विनी गंगावणे, भाग्यश्री शिंदे, आकांक्षा शेवाळे, साक्षी शेवाळे |
| 3 | एकपात्री नाटिका - स्त्रीभ्रूण हत्या | कल्याणी नाईक |
| 4 | गोंधळ- लल्लाटी भंडार | रेणूका ढोके |
| 5 | कोळीगीत- या कोळीवाड्याची शान आई तुझ देऊळ | अश्विनी नाईक कल्याणी नाईक |
| 6 | पथनाट्य- बचत पाण्याची समृद्धी जीवनाची | चंद्रमणी बनसोडे, आरती केजभट, साक्षी शेवाळे, ऋतुजा अंभोरे, पायल तावरे, निकिता सिहरे, भाग्यश्री शिंदे, अभिजीत झरकर, समाधान दांगोडे |
| 7 | छूम छूम पायी वाजे घुंगुर | राधा मिसाळ |
| 8 | ही झुमके वाली पोरं | अश्विनी नाईक, पायल तावरे |
| 9 | अप्सरा आली लावणी | आरती प्रधान |
| 10 | घर मोरे परदेसिया | अश्विनी नाईक |
| 11 | मुकाभिनय - मोबाईलचा दुष्परिणाम | पायल तावरे, साक्षी शेवाळे, प्राजक्ता इंगळे, आकांक्षा शेवाळे, भाग्यश्री शिंदे, राधा मिसाळ |
| 12 | शास्त्रीय नृत्य - नटरंग उभा | अश्विनी नाईक |

- **<u>वार्षिक स्नेहसंमेलन (दिनांक 9 फेब्रुवारी 2024)</u>**



**वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन व उद्घाटन प्रसंगी विचार व्यक्त करताना श्री. राधेश्याम मिसाळ (माजी विद्यार्थी व कलावंत)**




**गणेश वंदना - अश्विनी नाईक**




वासुदेवगीत - सुंदर माझे जाते ग - आरती प्रधान, राधा मिसाळ, पायल तावरे, अश्विनी गंगावणे, भाग्यश्री शिंदे, आकांक्षा शेवाळे, साक्षी शेवाळे



एकपात्री नाटिका - स्त्रीभ्रूण हत्या - कल्याणी नाईक




**गोंधळ- लल्लाटी भंडार- रेणूका ढोके**



**कोळीगीत- या कोळीवाड्याची शान- अश्विनी नाईक, कल्याणी नाईक**




**पथनाट्य- बचत पाण्याची समृद्धी जीवनाची- चंद्रमणी बनसोडे, आरती केजभट, साक्षी शेवाळे, ऋतुजा अंभोरे, पायल तावरे, निकिता सिहरे, भाग्यश्री शिंदे, अभिजीत झरकर, समाधान दांगोडे**




**छूम छूम पायी वाजे घुंगुर- राधा मिसाळ**




ही झुमके वाली पोरं- अश्विनी नाईक, पायल तावरे




अप्सरा आली लावणी- आरती प्रधान




घर मोरे परदेसिया- अश्विनी नाईक




मुकाभिनय - मोबाईलचा दुष्परिणाम- पायल तावरे, साक्षी शेवाळे, प्राजक्ता इंगळे, आकांक्षा शेवाळे, भाग्यश्री शिंदे, राधा मिसाळ




**शास्त्रीय नृत्य - नटरंग उभा- अश्विनी नाईक**




**युवा महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभागाबद्दल विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती छायाचित्रे



वक्तृत्व स्पर्धेत विचार व्यक्त करताना कु. आरती केजभट




प्रमाणपत्र वितरण



डॉ. विवेक घोलप मार्गदर्शन करताना




प्राचार्य डॉ. एस आर टकले अध्यक्ष समारोप करताना




ग्रंथ प्रदर्शन



महाराष्ट्र टाइम्स

## महापुरुषांचे विचार आत्मसात करा

**डॉ. विवेक घोलप यांचा सल्ला**

**म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री**

येथील श्री. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे आयोजन करण्यात आले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रासंगिकता' या विषयावर विचार मांडण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयातील मराठी विभागातील डॉ. विवेक घोलप उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. प्रेम चव्हाण यांनी बुद्धवंदना म्हटली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन माळेगावकर यांनी केले.

डॉ. घोलप म्हणाले, 'देशात अनेक लोक जन्मतात आणि मरतात; परंतु डॉ. बाबासाहेबांसारखे भाग्य लाभत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी आपले जीवन झिजवले. समाजाने ज्ञान आणि परंपरा यांची कास धरली पाहिजे. ही धारणा धरून आपणास दुःखातून बाहेर पडायचे असेल तर लढायला शिकले पाहिजे. हा मंत्र समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला.' 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वप्नांना ध्येय बनवून समाजाप्रती स्वाभिमान व्यक्त केला. महापुरुषांची कृती आणि विचार ही राष्ट्राची संपत्ती असते. त्यामुळे महापुरुषांचे विचार आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी विचारांची पारायणे घडवून आणावी लागतील,' असेही ते म्हणाले. याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा कृषी, सिंचन, शिक्षण, स्त्रियांच्या समस्या, संरक्षण, अशा विविध कार्यांच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी प्रयत्न केले. आकांक्षा शेवाळे हिने आभार मानले.

बातमी प्रसिद्धी




**लोकगीत**

बनसोडे चंद्रमणी संजय    तावरे पायल कचरू

इंगळे प्राजक्ता संजय    नाईक कल्याणी मुरलीधर

केजभट आरती




**भजन**

दांगोडे शिवा नथ्थू    दांगोडे समाधान नथ्थू

बनसोडे चंद्रमणी संजय    केजभट आरती गवनाजी

इंगळे प्राजक्ता संजय    नाईक कल्याणी मुरलीधर




**लावणी**

नाईक अश्विनी ज्ञानेश्वर

तावरे पायल कचरू